“नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुराची सामाजिक व आर्थिक स्थिती : एक समाजशास्त्रीय अध्ययन”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ,नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी.पदवी संपादन करण्याकरिता सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा

संशोधक
सिद्धार्थ दिगांबर शेळके

मार्गदर्शक
डॉ.शेकोबा परशुराम ढोले
(समाजशास्त्र विभाग प्रमुख)
श्री.दत्त कला,वाणीज्य,व विज्ञान महाविद्यालय,हदगाव

संशोधन केंद्र
सामाजिक शास्त्रे संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
मार्च २०२२

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ,नांदेड
मानव्य विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील
पीएच.डी.पदवी (कोर्स वर्क) करिता कृती कार्य

सिद्धार्थ

संशोधक

सिद्धार्थ दिगांबर शेळके

मार्गदर्शक

प्रा.डॉ.शेकोबा परशुराम ढोले

(समाजशास्त्र विभाग प्रमुख)

श्री.दत्त कला,वाणीज्य,व विज्ञान महाविद्यालय,हदगाव

<u>संशोधन केंद्र</u>

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

२०२२

अनुक्रमणिका

प्रकरण	विवरण
पहिले	प्रस्तावना
दुसरे	संशोधन पद्धती व पुर्व संशोधन साहित्याचा आढावा
तिसरे	नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या भूमिहीन शेतमजुराची सामाजिक स्थिती
चौथे	नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या भूमिहीन शेतमजुराची आर्थिक स्थिती
पाचवे	अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुर आणि शासकीय योजनेचा आढावा
सहावे	अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुराच्या सद्यास्थितीतील उत्पादन स्त्रोताचा आढावा
सातवे	निष्कर्ष व शिफारसी
	संदर्भसाहित्याचा आढावा

१. प्रस्तावना :

भारत देश हा कृषीप्रधान देश आहे.देशातील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे.तसेच शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबुन आहे म्हणजेच निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती तुन मिळणारे उत्पन्न कमी आहे त्यामुळे शेती हा निसर्गासोबत खेळलेला जुगार आहे.असे म्हणले तर वावगे ठरणार नाही.

भारतीय समाज हा जाती व्यवस्थेवर आधारीत असल्याने जातीने घालुन दिलेल्या व्यवसायावर प्रत्येक वर्णातील व्यक्ति आपला उदरनिर्वाह जाती व्यवसायावरुन करीत आलेला आहे.वर्णव्यवस्थेतील चार वर्णाच्या व्यतिरिक्त पाचवा समाजला जाणारा अस्पृष्य / चांडाळ वर्ण म्हणजे भारतीय संविधानावरुन त्यांनाच अनुसुचित जाती (Scheduled Caste) म्हटले जाते.असे अनुसूचित जातीकडे परंपरागत उत्पन्नाचे साधन किंवा व्यवसाय नाही इतरांच्या शेतीवर हा समाज वर्षानुवर्षे शेतमजुर म्हणुन राबत आलेला आहे.

“Center for the study of developing societies” या संस्थेच्या सर्वेक्षणातून असा निष्कर्ष समोर आला आहे की, भारतातील ८३% लोक केवळ शेती याच व्यवसायावर अवलंबुन आहेत. तसेच १४% लोक भुमिहीन आहेत. जे इतराच्या शेतीवर दैनंदिन गरज पूर्ण करण्यासाठी वर्षातील बहुतांश दिवस ते राबत असतात.

शेतीवर राबणारा पण शेतीची मालकी नसलेला वर्ग म्हणजे भूमिहीन शेतमजूर वर्ग होय. त्यामध्ये अनुसूचित जातीची बहुतांश लोकसंख्या ही भूमीहीन असल्याची दिसून येतो.त्यामुळे अनुसूचित जातीतील शेतमजूरांची सामाजिक स्थिती आणि आर्थिक स्थिती अतिशय बिकट असल्याचे दिसुन येते.

देशातील अनुसूचित जातीची लोकसंख्या

सन	एकूण लोकसंख्या	पुरुष प्रमाण	स्त्री प्रमाण
1991	13,82,23277	57%	43%
2001	16,66,36000	52%	48%
2011	18,21,75898	55%	45%

Source.www.shodhganga.infilibnet.ac.in

अनुसूचित जातीची ऐतिहासीक पार्श्वभूमी :-

वैदीक कालखंडामध्ये आजचे अनुसूचित जाती संवर्गासाठी चांडाळ हा शब्दप्रयोग केला जात असे.त्यांची वस्ती ही गावकुसाबाहेर होती.डॉ.जी.एस.घुर्ये च्या मते वैदीक काळात स्पृश्य - अस्पृश्य, शुद्र - अशुद्र अशा प्रकारची भावना समाजात प्रखर होती.

स्मृती कालखंडामध्ये अस्पृश्य / चांडाळ हा समुदाय गावाबाहेर फेकला गेला. पुढे मनुच्या समाजव्यवस्थेच्या कालखंडामध्ये अनुसूचित जातीतील अस्पृश्यांना अति निम्न दर्जाची कार्य व गौन दर्जाची वागणुक प्रखरतेने देण्यात आली.

अनुसूचित जातीच्या व्याख्या :

ब्रिटिश सरकारच्या सायमन कमीशन ने अनुसूचित जाती हा शब्दप्रयोग पहिल्यांदा उपयोगात आणला. तेंव्हा ब्रिटिश सरकारने एकूण ४२९ जातीची यादी करुन त्यासर्व जातीला अनुसूचित जाती या श्रेणी मध्ये समाविष्ट केले.आज महाराष्ट्रात अनुसूचित जाती मध्ये समाविष्ट असलेल्या जातीची संख्या एकुण संख्या ६० इतकी आहे.

डॉ.दत्ता भगत यांच्या मते "जी जाता जात नाही ती म्हणजे जात होय"

डॉ. डी. एन. मुजूमदार यांच्या मते "जात हा एक बंद वर्ग आहे."

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते "जाती अंतर्गत विवाहाची जाती बाह्य विवाहावर असलेली बंधने म्हणजे जात होय."

भारतीय लोकसंखेच्या एकुण लोकसंख्येमध्ये १६% लोकसंख्या ही अनुसुचीत जातीची आहे हा वर्ग बहुसंख्य असुन इतराच्या शेतीवर शेतमजुर म्हणुन राबणारा असल्याने त्याची संख्या जास्त आहे.शेतीतील रोजगार हंगामी स्वरुपाचा असल्याने त्यांचे आर्थिक उत्पन्न कमी असुन त्यामुळे सामाजातील सामाजिक दर्जा,स्थान देखील गौन स्वरुपाचे दिसुन येते.दैंनदिन उदरनिर्वाहसाठी त्यांना सवर्ण,जमीनदार वर्गावर अवलंबुन राहावे लागते.त्यामुळे मानसिक,सामाजिक,आर्थिक,शारीरीक एकुण सामाजिक समस्येला सामोरे जावे लागते. त्यामुळे हा समाज निम्न दर्जाचे जीवन जगत आहे.आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात बंड करण्याचे देखील सामर्थ्य अस्पृश्य जातीमध्ये असल्याचे दिसुन येत नाही.

भूमिहीन शेतमजुर म्हणजे काय ? :-

समाजव्यवस्थेतील असा एक वर्ग ज्यांच्या कडे कोणत्याही प्रकारची शेतीची मालकी नसुन इतराच्या शेतीवर तो राब राब राबत असतो. असे हे जन म्हणजे भुमिहीन शेतमजुर होय.यांची संख्या समाजात खुप मोठ्या प्रमाणात आहे.

काँग्रेस द्वारे गठीत केलेल्या एका कृषि समितीने शेतमजुर वर्गाला तीन भागात विभाजित केले.

१ शेतीवर काम करणारे शेतमजुर

२ साधारण शेतमजुर

३ कुशल शेतमजुर

२०११ च्या जनगननेनुसार अनुसुचीत जातीचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण ४९.५०% होते महाराष्ट्र राज्यात हेच प्रमाण ११.०८% होते. २०११ मधील नांदेड जिल्ह्यातील एकुण लोकसंख्या ३३,६१,२९२ इतकी होती.त्यामध्ये अनुसुचीत जातीची लोकसंख्या ६,४०,४८३ एवढी होती.

२. समस्यासुत्रण :

सामाजिक संशोधन कार्यातील निश्चितेसाठी संशोधन विषयाची निवड करावी लागते. “नांदेड जिल्ह्यातील अनुसुचीत जातीची भुमिहीन शेतमजुराची सामाजिक आणि आर्थिक स्थिती : एक समाजशास्त्रीय अध्ययन हा संशोधना साठी निवडलेला विषय आहे. प्राचीन काळापासुन समाजव्यवस्थेत ह्या समुदायाचे सामाजिक स्थान गौण स्वरुपाचे असुन पुर्वीपासुन कोणताही उत्पन्नाच स्त्रोत त्यांच्याकडे जातीव्यवस्थेने येऊ दिला नाही किंवा कोणत्याही उत्पन्नाचा / साधनाची मालकी या अस्पृश्य समाजाला नव्हती त्याच बरोबर धनसंचयाचा कोणताही अधिकार समाजव्यवस्थेने दिला नव्हता त्यामुळे आजपर्यंत अस्पृश्य समाजाला कोणताही परंपरागत व्यवसाय उत्पन्नासाठी मिळालेला नाही त्यामुळे त्याची आर्थिक स्थिती अतिशय नाजुक बनलेली आहे.

स्वातंत्रोत्तर काळामध्ये भारतीय संविधानाने सर्वांना शिक्षण रोजगार व्यवसाय या विषयी स्वातंत्र्य बहाल केले आणि त्यामुळे हा शेतमजुर वर्ग ग्रामीण भागातुन रोजगारासाठी इतरत्र पलायल करताना दिसतो कारण शेतीवर राबणारा भुमिहीन वर्ग त्यांना जमीनदार वर्ग कोणत्याही प्रकारे कामाचा योग्य मोबदला देत नाहीत. त्यामुहे त्यांचे उत्पन्न हे अत्यंत अल्प स्वरुपाचे आहे. तसेच शारीरीक पिळवणुक मोठ्या प्रमाणात आहे. शासन दरबारी अनेक योजना असुन सुद्धा त्या योजना त्यांच्या पर्यंत पोहचल्या जात नाहीत. हा यांचा प्रश्न समाजव्यवस्थेत प्रखरपणे जाणवतो. अशा प्रश्नांची शासन दरबारी याची नोंद व्हावी म्हणुन हा विषय अभ्यासासाठी निवडणे गरजेचे होते.म्हणुन संशोधनाचा हा विषय अभ्यासासाठी घेतला गेला आहे.

३. संशोधनाचे महत्व

प्राचीन काळापासुन समाजव्यवस्थेत अस्पृश्य समजला जाणारा भुमिहीन शेतमजुर वर्ग त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती हालाखीची आहे.त्याच्या अभ्यासासाठी विषयाची निवड करण्यात आली आहे. अनुसूचित जातीतील भूमीहीन वर्ग मुलता: ग्रामीण भागाशी संबधीत असल्याने प्राचीन काळापासुन जातीच्या बंधनामुळे प्राचीन उत्पन्नाचा कोणताही स्त्रोत त्यांच्याकडे नाही. तसेच मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील भुमिहीन शेतमजुराची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारली आहे का? त्यांची राहणीमान सुधारले आहे का? अनुसुचीत जातीची भुमिहीन संख्येत वाढ किंवा घट झाली आहे का? भुमीहीनाची आर्थिक उन्नती झाली आहे का? तसेच शेतीच्या धारण क्षेत्रात बदल झाला आहे का ? शासनाच्या भुमीहीन शेतमजुरासाठी असलेल्या योजना किती प्रमाणात त्यांच्या पर्यंत पाहेचल्या . या प्रश्नाचा शोध घेण्यासाठी या संशोधन विषयाचे महत्व असल्याचे सांगता येते.

४. अध्ययन विषयाची उद्दिष्टे

१ अनुसूचित जातीतील भुमिहीन शेतमजुराचा पुर्व इतिहास जाणुन घेणे

२ अनुसूचित जातीतील भुमिहीन शेतमजुराच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

३ अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुराच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे

४ अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुराच्या स्थंलातराची कारणे जाणुन घेणे.

५. अनुसूचित जातीतील भूमिहीनांसाठी असलेल्या शासकीय योजनेचा आढावा घेणे.

६ अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुराच्या विकासासाठी शिफारसी करणे.

५. अध्ययन विषयाची गृहितके

१ अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुराची सामाजिक स्थिती निम्न दर्जाची आहे.

२ अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुराची आर्थिक स्थिती हालाकीची आहे.

३ अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुर शासकीय लाभापासुन वंचित आहे.

४ अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुरामध्ये बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे.

६. संशोधन पद्धतीचा वापर

संशोधन कार्य करताना शास्त्रीय पद्धतीचा वापर करणे म्हणजे संशोधन पद्धती होय. **"नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील शेतमजुराची सामाजिक व आर्थिक स्थिती : एका समाज शास्त्रीय अध्ययन"** हा संशोधनाचा विषय असुन यासाठी प्रत्यक्ष व्यावहारीक समाजशास्त्रीय पद्धतीने संशोधन कार्य करण्यात येणार आहे त्यासाठी संशोधन आराखडा,नमुना निवड पद्धती तसेच तथ्य संकलनाचे प्राथमिक द्वितिय स्त्रोत याच्या माध्यमातुन माहितीचे संकलन करण्यात येणार आहे.सामाजिक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करुन प्राथमिक तथ्यामध्ये मुलाखत, प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात येणार आहे.

७. तथ्य संकलन

संशोधन कार्याचे क्षेत्र हे नांदेड जिल्ह्यातील हदगाव,भोकर,आणि हिमायतनगर हे तालूके असल्याने तथ्य संकलनाचे प्राथमिक आणि द्वितिय स्त्रोत यांच्या माध्यमातुन तथ्याचे संकलन करण्यात येणार आहे.संकलीत केलेल्या तथ्यांना वर्गीकरण,सांकेतिकरण करुन विभागल्या जाईल.

अ. प्राथमिक साधने :

तथ्य संकलनाच्या प्राथमिक साधनामध्ये संशोधन कार्यासाठी निरिक्षण,प्रश्नावली, मुलाखात या साधनाचा वापर करण्यात येणारे आहे..

ब. द्वितिय साधने :

तथ्य संकलनाच्या द्वितीय साधनामध्ये जसे की दै. वर्तमान पत्रे, संदर्भ साहित्य ग्रंथ,मासिके,शासकीय अहवाल,गॅजेट इतर दस्ताऐवज तसेच शासनाकडुन वेळोवेळी प्रकाशीत होणारी माहीती,आकडेवारी तसेच ग्रंथालयात उपलब्ध होणारे प्राचीन ग्रंथ यांच्या सहाय्याने संशोधन विषयासंदर्भात उपलब्ध होणाऱ्या साधनाद्वारे संशोधनाशी संबधीत तथ्याचे संकलन करण्यात येणार आहे.

८. नमुना निवड पद्धती

संशोधन कार्याच्या संदर्भात नमुना पद्धतीचे महत्व हे अनन्य साधारण महत्वाचे आहे.प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधना संबंधी नमुण्याची निवड करावी लागते या संशोधनात नमुना निवड पद्धतीच्या गैर संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक नमुना निवड आणि उद्देशपुर्ण नमुनानिवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.नमुना निवड पद्धतीद्वारे संशाधेनाचे विस्तृत क्षेत्र संक्षिप्त करुन नांदेड जिल्ह्यातील हदगाव,हिमायतनगर, आणि भोकर तालुक्यातील प्रत्येकी शंभर नमुने या प्रमाणे एकुण ३०० नमुने अभ्यासासाठी निवडले जातील

९. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संबधित संशोधनाचे क्षेत्र महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील हदगाव,हिमायतनगर आणि भोकर हे तीन तालुके आहेत.या तिन तालुक्यातील अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुर (महार,बौद्ध,मातंग, चाभार,बुरुड,भंगी) या जातीच्या अभ्यासापुरते संशोधनाचे क्षेत्र मर्यादित असेल.

१०. संशोधन साहित्याचा आढावा :

सदरील विषयाच्या संदर्भात पुर्वी ज्या काही व्यक्तीने संशोधन कार्य केले आहे त्याचा आढावा खालील प्रमाणे

१ ब्राम्हे सुलभा : "महाराष्ट्रातील शेतमजुर" या विषयावर संशोधन कार्य करुन भूमिहीन शेतमजुराच्या सामाजिक स्थितीचे आणि आर्थिक स्थितीचे वर्णन केले आहे.

२ प्रा.सरवदे अशोक शिवाजी : यांनी अनुसुचीत जातीचे आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे अध्ययन केले शेती ही निसर्गावर अवलंबुन असुन निसर्गाच्या लहरीप्रमाणे आणि हंगामी रोजगारमुळे भूमिहीनाचे अतिअल्प आहे. परंपरागत शेतीची अवजारे हा सामाजिक दर्जा निम्न असल्याचे कारणे आहेत.

३ पुजा मंडल: यांनी आपल्या अनुसूचित जातीच्या समस्या या शोधनिबंधामध्ये नाशिक जिल्ह्यचा संदर्भ देऊन अनुसूचित जातीच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केला.

४ सिंग सोरण (१९८१) : यांनी उत्तर प्रदेशातील जैतापुर जिल्ह्याच्या संदर्भात अनुसुचित जातीची सामाजीक व आर्थिक स्थितीबद्दल लिहले आहे .त्याच्या निष्कर्षात आज अनुसुचीत जातीची स्थिती सुधारल्याचे म्हटले आहे.

५ मुमताज अली खान (१९८०) : यांनी त्याच्या भारतीय अनुसूचित जाती आणि त्यांची स्थिती या विषयी अध्ययन केले आहे.

६ माथुर आर.एस. (१९७५) : यांनी आपल्या अध्यनामध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचार भेदभावाचे कारणे कोणती .स्त्रोत कोणते यावर सखोल अध्ययन केले.

११. प्रकरण रचना

संशोधन कार्याच्या पुर्णत्वाची प्रक्रिया म्हणजे अहवाल लेखन होय.हे अहवाल लेखन म्हणजे संशोधन कार्याच्या पुर्णत्वाचे प्रतिबिंब असते.सदरील विषयक संशोधन विषय हा सहा प्रकरणामध्ये विभाजित करण्यात येणार आहे.सदर संशोधन कार्याची प्रकरण रचना खालील प्रमाणे

प्रकरण १ प्रस्तावना : पहिल्या प्रकरणामध्ये अनुसूचित जाती म्हणजे काय ? त्याचा पुर्ण इतिहास, समाजातील पुर्वीचे स्थान आणि आजच्या सामाजीक दर्जातील बदल, आजची लोकसंख्या, लोकसंख्यात्मक आकडेवारी, अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट एकुण जाती त्यांच्या स्थितीचे अध्ययनाच्या संदर्भात माहितीचे वर्णन केले जाईल. तसेच भूमीहीन शेतमजुर यांच्या संदर्भात माहीती असेल.

प्रकरण २ संशोधन पद्धती व पुर्व संशोधन साहित्याचा आढावा :

सामाजिक संशोधन विषयी संदर्भात संशोधनासाठी वापरण्यात येणारी साधने त्यात संशोधनपद्धती, नमुनानिवड, संशोधन आराखडा, संशोधनाची उद्दिष्टे ,गृहिकृते यांच्या माहितीबरोबरच या पुर्वी केलेल्या संशोधन कार्याच्या संदर्भात साहित्याचा आढवा घेणे.

प्रकरण ३ नांदेड जिल्ह्यातील अनुसुचीत जातीच्या भुमिहीन शेतमजुराची सामाजिक स्थिती : पुर्वीची अनुसूचित जातीची सामाजिक स्थिती सद्ध्याची सामाजिक स्थिती त्याचबरोबर आजची धार्मीक ,राजकीय आणि शैक्षणिक स्थिती याविषयी अध्ययन केले जाईल.

प्रकरण ४ नांदेड जिल्ह्यातील अनुसुचीत जातीतील भुमिहीन शेतमजुराची आर्थीक स्थिती : अनुसूचित जातीतील पुर्वीची उत्पन्नाची साधने सध्यास्थितीत त्यात झालेला बदल व त्यांची पुर्वीची आर्थिक स्थिती आणि सध्यास्थितीत झालेला बदल याविषयी अध्ययन करण्यात येणार आहे.

प्रकरण ५ अनुसूचित जातीतील भूमीहीन शेतमजुर आणि शासकीय योजनेचा आढावा :

सद्यास्थितीत अनुसूचित जाती या संवर्गासाठी असलेल्या शासकीय योजनेचा अभ्यास तसेच शासकीय योजनेचा लाभ आणि त्यातुन सामाजिक दर्जामध्ये काय परिवर्तन झाले आहे का ? याचे अध्ययन करण्यात येणार आहे.

प्रकरण ६ अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुराच्या उत्पादन स्त्रोताचा आढावा

अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुराचे पारंपारीक उत्पादनाचे साधने आणि आजचे उत्पादन स्त्रोत कोणती आहे? नवीन शासकीय योजना किंवा इतर आधुनिक साधनाद्वारे त्यांच्या आर्थिक स्थिती मध्ये काही सुधारणाझाली आहे का ? या विषयी अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण ७ निष्कर्ष व शिफारशी :

संशोधन साहित्याच्या संदर्भात तथ्य संकलन करुन संशोधनाची गृहीतकृत्याला पुष्टी देणारे काही निष्कर्ष काढण्यात येतील आणि निष्कर्षावर आधारीत अनुसूचित जातीतील भूमीहीन शेतमजुराच्या सर्वांगीन स्थिती सुधारणा करण्यासाठी शिफारशी करण्यात येतील.

संदर्भ ग्रंथसुची

१. **प्रदिप आगलावे (२०००)** संशोधन शास्त्र व तंत्रे श्री साईनाथ प्रकाशन,नागपुर.

२. **गुरुनाथ नानगोंडे :** भारतीय समाजरचना, प्रकाशन मनोहर पिंपळापूरे रामदास पेठ नागपूर-१०

३. **प्रा.डी.एस.मनोहर :** भारतीय समाज प्रश्न आणि समस्या,प्रकाशन अरुना प्रकाशन साई कुंज सद्‌भावना नगर औसा रोड लातुर.

४. **सुलभा ब्राम्हणे :** महाराष्ट्रातील शेतमजुर प्रकाशन अनिल अवचार, फुले समता प्रतिष्ठान भवानी पेठ,विठोबा चौक पूणे.प्रथम आवृत्ती मार्च १९८३.

५. **प्रा.सरवदे अशोक शिवाजी :** बीड जिल्ह्यातील अनुसूचित जातीचे आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ औरंगाबाद.

६. **प्रो.एम.एल.गुप्ता ॲन्ड डी.डी. शर्मा :** प्रतियोगिता साहित्ये प्रकाशक : साहित्य भवन पब्लिकेशन्स, हॉस्पिटल रोड, आगरा २८२-००३

७. www.shodhganga.infilibnet.ac.in

संशोधक

सिद्धार्थ दिगांबर शेळके

मार्गदर्शक

डॉ.शेकोबा परशुराम ढोले

(समाजशास्त्र विभाग प्रमुख)

श्री दत्त कला,वाणीज्य व विज्ञान महाविद्यालय

हदगाव जि.नांदेड